## प्रेस नोट

## दिनांक ०८/०९/२०२०

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) श्री. पवन ओंकारराव सोमवंशी, वय ३५ वर्ष, पद—ग्रामसेवक, नेमणूक — ग्रामपंचायत कार्यालय बेसखेडा,ता. वरुड,जि. अमरावती, (वर्ग—३)<br>२) श्री. विष्णु सदाशिवराव यावले, वय ४७ वर्ष, पद—सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय बेसखेडा,ता. वरुड,जि. अमरावती, |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०८.०९.२०२० चे १५.५६ ते १६.०८ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | प्रत्येकी १०,०००/—रु. असे एकुण २०,०००/— रुपये |
| ५ | पडताळणी दरम्यान तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | प्रत्येकी ७,०००/—रु. असे एकुण १४,०००/— रुपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १४,०००/— रुपये |
| ६ | घटनास्थळ | पंचायत समिती कार्यालय, वरुड बाजुचे चहाचे टपरी ता.वरुड जि. अमरावती. |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार हे ग्रामपंचायत बेसखेडा येथे ग्रामरोजगार सेवक असून त्यांनी दि. ०७/०९/२०२० रोजी दिलेल्या तक्रारी च्या अनुषंगाने दि.०८/०९/२०२० रोजी पडताळणी कारवाई दरम्यान ग्रामपंचायत बेसखेडा येथील सरपंच श्री.विष्णु यावले व ग्रामसेवक श्री.पवन सोमवंशी यांनी तक्रारदार यांना ग्रामपंचायत बेसखेडा येथे महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत रस्त्याच्या कडेला सुरु असलेल्या वृक्ष लागवडीचे कामामध्ये बोगस रोजगार दाखवुन त्यांचे नावाने बिल काढुन त्यांचे कडुन पैसे जमा करुन महिण्याला प्रत्येकी १०,०००/—रु. याप्रमाणे महिण्याला एकुण २०,०००/—रु. अशी लाचेची मागणी पंचासमक्ष करुन तडजोडीअंती प्रत्येकी ०७,०००/—रु. याप्रमाणे महिण्याला एकुण १४,०००/—रु. स्विकारण्याचे मान्य करुन सापळा कारवाई दरम्यान सरपंच श्री.विष्णु यावले यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचे कडुन आलोसे श्री. पवन सोमवंशी, ग्रामसेवक यांचे उपस्थितीत १४,०००/— रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच दोघांनाही ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावतीचे मा.पोलीस अधिक्षक, श्री. श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधिक्षक श्री.पंजाबराव डोंगरदिवे, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र जेधे, पो.नि. श्रीमती रूपाली पोहनकर, पोकॉ. श्री.पंकज बोरसे, श्री.शैलेश कडू, श्री.राजेश कोचे तसेच चालक ना.पो.शी. अकबर हुसेन यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यानी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा

संपर्क :— अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती टोल फ्री क्र. — १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ — २५५२३५५, २५५३०५५.

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ★ अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ★ सत्यमेव जयते

(रविंद्र जेधे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

Scanned with CamScanner